शिक्षण / सेप्रव /             / २०१२-१३

**मा.अध्यक्ष,**

------------------------------------

-------------------------------------

-------------------------------------

स.न.वि.वि.

महोदय,

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित,पुणे.ही राज्यस्तरीय संघीय संस्था राज्यात गेल्या ९५ वर्षापासून सहकारी चळवळीत प्रचार,प्रसिध्दी,शिक्षण,प्रशिक्षण,संशोधन व सहकारी चळवळीचा प्रवक्ता म्हणून काम करत आहे.

राज्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांचे संभाव्य सभासद,सभासद,समिती सदस्य,पदाधिकारी,सेवक व सहकारी खात्यातील सेवकांना शिक्षण / प्रशिक्षण देण्याचे कार्य राज्य सहकारी संघ त्यांचे १३ सहकार प्रशिक्षण केंद्र, २ सहकारी प्रबंध संस्थान, ३३ जिल्हा सहकारी मंडळे व ६ विभागीय सहकारी मंडळे यांच्या मार्फत अविरतपणे करत आहे.

९७ व्या घटना दुरुस्ती अन्वये सहकारी संस्थांचे सभासदांना सहकारी शिक्षण / प्रशिक्षण देणे अनिवार्य केले आहे.घटनेतील तरतूद **२४३ झेड ओ ( ३ )** अन्वये सहकारी संस्थांचे सभासदांना सहकारी शिक्षण / प्रशिक्षण देणे बंधनकारक आहे.घटनेतील या तरतूदीचे पालन सहकारी संस्थांनी न केल्यास घटनेतील तरतूदीचा भंग होईल व त्याची जबाबदारी संस्थेचे संचालक मंडळावर निश्चित होवू शकते.

९७ व्या घटना दुरुस्ती अन्वये राज्याच्या सहकार कायद्यामधे नव्याने कलम २४ ( अ ) अंतर्भूत करुन सभासद / सेवक / पदाधिकारी / संचालक मंडळ यांचे सहकारी शिक्षण / प्रशिक्षणाची जबाबदारी संबधीत सहकारी संस्थेवर सोपविलेली आहे.म्हणजेच सर्व सहकारी संस्थांना आपल्या सभासदांना सहकारी शिक्षण / प्रशिक्षण देणे बंधनकारक व अनिवार्य केले आहे.

घटनेतील तरतूद व त्या अनुषंगाने राज्याच्या सहकार कायद्यात नव्याने करण्यात आलेल्या तरतूदींचे पालन आपणाकडून होणेस्तव महाराष्ट्र राज्य सहकारी संघाने राज्यात सहकारी संस्थांचे सभासदांना सहकारी शिक्षण / प्रशिक्षण देण्यासाठी सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात ११३३० सभासद प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन केले असून ११३३० महसूली गावांची व संस्थांची निवड केली आहे.त्यात आपल्या संस्थेची निवड झाली असून,आपल्या संस्थेचे सभासदांसाठीचा शिक्षण / प्रशिक्षण कार्यक्रम दि.---------------------- ते ----------------------- रोजी आपल्या संस्थेच्या ठिकाणी घेण्यात येणार आहे.त्यासाठी संघाचे सहकार शिक्षणाधिकारी गावातच मुक्कामी राहाणार आहेत.

ते आपणाशी प्रत्यक्ष संपर्क साधणार आहेतच.त्यासाठी संघाने दर्जेदार प्रशिक्षण मोडयूल ( प्रशिक्षण टिपण ) तयार केले आहे.त्याचा लाभ संस्थेने आपल्या सभासदांना करुन द्यावा.या प्रशिक्षणसाठी आपल्या संस्थेचे / गावातील इतर सहकारी संस्थांचे सभासदांनाही उपस्थित राहाणेविषयी आपले स्तरावरुन उचित कार्यवाही व्हावी.तसेच हा प्रशिक्षण कार्यक्रम पार पाडण्यासाठी आपले सहकार्याचे अपेक्षेसह, ही संधी महाराष्ट्र राज्य सहकारी संघास द्यावी ही नम्र विनंती.

अधिक माहितीसाठी आपल्या जिल्हयातील सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था / जिल्हा सहकारी बोर्डाकडील विशेष कार्याधिकारी वर्ग - २/ जिल्हा सहकार विकास अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

आपला विश्वासू

( डॉ.आनंद ब.जोगदंड )
अपर निबधंक,सहकारी संस्था तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी